अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

MO.9860898564

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -५८ | गुरूवार दि.१६ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -58 | WEDESNDAY DT.16 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## राजकिशोर मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त अंबाजोगाई परिसरातील महिलांसाठी होम मिनिस्टर

### खेळ रंगला पैठणीचा या मनोरंजनात्मक व स्पर्धात्मक कार्यक्रमाचे आयोजन सिने कलावंत क्रांतीनाना मळेगावकर करणार कार्यक्रमाचे सादरीकरण

अंबाजोगाई(वसुदेव शिंदे)

अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष, तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजकिशोर मोदी यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने शहरातील महिलांसाठी होम मिनिस्टर, खेळ रंगला पैठणीचा या स्पर्धात्मक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सादरीकरण सुप्रसिद्ध टीव्ही व सिने कलावंत क्रांतीनाना मळेगावकर हे करणार आहेत . या कार्यक्रमाअंतर्गत महिलांच्या विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत.विजेत्या महिलांना पैठणी व उपविजेत्या व सहभागी स्पर्धकास आकर्षक भेटवस्तू दिली जाणार आहे . तसेच या कार्यक्रमात गप्पा, गोष्टीं व कॉमेडी चा सदाबहार मेजवानी देखील याद्वारे उपस्थित सर्व महिला प्रेक्षकांना मिळणार आहे.

# दिवाळीत शेतकऱ्यांना आनंदाचा 'मेसेज'

## पीकविमा अग्रिमचे २०६ कोटी जमा

परळी वैजनाथ - यंदाच्या खरीप हंगामात संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना ऐन दिवाळीत 'आनंदाचा मेसेज' आला. जिल्ह्यातील सहा लाख ३४ हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे सोमवारी (ता. १३) २५ टक्के पीक विमा अग्रिमचे २०६ कोटी रुपये जमा झाले.

ज्या शेतकऱ्यांना अग्रिम पीक विम्याची रक्कम एक हजार रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांना नियमाप्रमाणे किमान एक हजार रुपये याप्रमाणे रक्कम मिळावी, असा नियम आहे. त्यामुळे उर्वरित एक लाख ३४ हजार शेतकऱ्यांना ३५ कोटी रुपयांचे वाटपही लवकरच होणार आहे. यंदा खरीप हंगामाची सुरुवातच संकटात झाली. सुरुवातीला पावसाने ओढ दिली. नंतर कसाबसा पाऊस आला. मात्र, सोयाबीन शेंगा लागण्याच्या हंगामातच पावसाने ओढ दिली. त्यामुळे खरिपातील सोयाबीनसह कपाशी, उडीद, मुग, आदी पिकांचे मोठे नुकसान झाले.

मात्र, सोयाबीन पिकाला २५ टक्के पीक विमा अग्रिम मंजूर व्हावा, या मागणीने जोर धरला. प्रधानमंत्री पीक विमा योजना जिल्हास्तरीय समितीच्या अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी तीन अधिसूचनांद्वारे जिल्ह्यातील सर्वच ८६ महसूल मंडळांतील सोयाबीनला विमा अग्रिम मंजुरी दिली. याचा लाभ जिल्ह्यातील सात लाख ७० हजार शेतकऱ्यांना होणार होता.

या विरोधात कंपनीने सुरुवातीला विभागीय आयुक्त व नंतर राज्याच्या तांत्रिक सल्लागार समितीसमोर आव्हान दिले. मात्र, विमा कंपनीचे अपील फेटाळल्याने शेतकऱ्यांना विमा अग्रिम लागू करण्याशिवाय कंपनीकडे कुठलाही पर्याय राहिला नाही. दरम्यान, शेतकऱ्यांना




दिवाळीत विमा अग्रिम रक्कम मिळेल, असे कृषीमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे म्हणाले होते.



केज/ प्रतिनिधी

**केज तालुक्यातील डोका या गावांमध्ये गेल्या सहा सात वर्षापासून दिवाळी च्या सणासाठी गोर गरिबां ची दिवाळी गोड व्हावी यासाठी गावच्या सरपंच सौ.कमल गोरख भांगे यांच्या हस्ते किराणा किटचे वाटप केले जाते. तसेच संक्रातीच्या सणाला महिलांना साडी चोळी देऊन त्यांचा सन्मान केला जातो असेही आमच्या प्रतिनिधीशी बोलताना गावचे प्रतिष्ठित नागरिक गोरख भांगे यांनी सांगितले की,आमच्यावर या गोर गरिबांचे मोठे उपकार आहेत याची परतफेड म्हणून आम्ही प्रतिवर्षी तीस ते चाळीस कुटुंबांना त्यांची दिवाळी गोड व्हावी यासाठी किराणा किटचे वाटप करत आहोत व यापुढेही करत राहणार आहोत असे गोरख भांगे यांनी बोलताना स्पष्ट केले. यावेळी गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# केज तालुक्यातील कानडी माळी येथे ओबीसी आरक्षण एल्गार सभेच्या तयारीसाठी बैठक



केज /प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडी माळी येथुन ओबीसी आरक्षण एल्गार सभेला जाण्याच्या तयारीसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले.याबाबत सविस्तर वृत्त असे की,जालना जिल्ह्यातील अंबड येथे सर्व ओबीसी नेत्यांच्या उपस्थितीमध्ये ओबीसी आरक्षण एल्गार सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून ओबीसी समाज एकवटला असूनलाखोंच्या संख्येने ओबीसी समाज अंबडला जाण्यासाठी तयारी करत आहे.याचाच एक भाग म्हणून केज तालुक्यातुनही यल्गार सभेच्या तयारीसाठी ठीकठिकांनी बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे.केज तालुक्यातील कानडी माळी या गावातून येथून एकुण १०० गाड्यां चे नियोजन करण्यात आलेले आहे.जालना जिल्ह्यातील अंबड,धाईत नगर,अंबड-पाचोड रोड येथे ओबीसी आरक्षण एल्गार सभेचे आयोजन शुक्रवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११-०० वाजता करण्यात आले आहे.सदरील एल्गार सभेसाठी ओबीसी नेते, समता परिषेदेचे संस्थापक अध्यक्ष तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या सह विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार,माजी मंत्री पंकजाताई मुंडे तसेच राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर,आमदार प्रकाश शेंडगे,आ.गोपीचंद पडळकर यांच्यासह अन्य ओबीसी नेते या एल्गार सभेसाठी उपस्थित राहणार आहेत.एल्गार सभेला मोठ्या प्रमाणावर हजेरी लावण्यासाठी सर्व महाराष्ट्रात ओबीसीसमाज बांधव तयारीला लागलेला आहे.केज तालुक्यातील गावागावात ओबीसी समाज बैठका घेऊन अंबड येथे एल्गार सभेला जाण्यासाठीचे नियोजन करत आहे.आणी त्याच अनुषंगाने केज तालुक्या तील कानडीमाळी येथेही नियोजन बैठक संपन्न झाली यामध्ये अंबड येथे जाण्यासाठी या गावातून १०० गाड्यांचे नियोजन ग्रामस्थांनी केले आहे.



**श्रीक्षेत्र भगवानगड व माझे आई-वडील काकू नाना यांची गुरु शिष्य परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून चालत आलेली आहे अनेक वर्षापासून मनामध्ये भगवान बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याची इच्छा होती आज ती प्रत्यक्षात आली विशेष म्हणजे भगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांचे ज्ञानेश्वरी वरील चिंतन व दोन्ही परिवाराची पारंपारिक चालत आलेली गुरु शिष्य पार्श्वभूमी यावर मुक्त चर्चा झाली श्रीक्षेत्र भगवानगडाचा झालेला कायापालट विकासात्मक दृष्टीला प्रेरणा देणारा आहे हे सर्व पाहून नक्कीच समाधान असल्याचे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले**

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने आज शेतकऱ्यांच्या विवीध मागण्यासाठी व्यापक बैठक

केज /प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट व सम विचारीपक्ष सर्व शेतकरी कष्टकरी यांना या बैठकीस उपस्थीत रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते सुरेश तात्या पाटील यांनी केले आहे.दिनांक १६ नोव्हेंबर २०२३ रोजी गुरुवारी सकाळी ठीक १०-०० वाजता समविचारी पक्षा तील सर्वांना आवाहन करण्यात आले आहे.केज तालुक्याला दुष्काळग्रस्त जाहीर केले असून पण यामध्ये महत्त्वाचा विषय म्हणजे केज तालुक्यातील चिंचोली माळी मसाजोग व नांदूर घाट हे महसूल मंडळे वगळण्यात आलेले आहेत.त्याकरिता हे महसूल मंडळे दुष्काळी यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी सर्व शेतकरी कष्टकरी व शेतमजूर व सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे पदाधिकारी शरद पवार गट व समविचारी पक्ष यांनी वेळ काढून दिनांक १६ नोव्हेंबर रोजी गुरुवारी सकाळी ठीक १०-०० वाजता शासकीय विश्राम गृह या ठिकाणी एकत्रित यावे व त्याच दिवशी तहसीलदार यांना निवेदन देणार आहेत व पुढील आंदोलनाची रूपरेषा ठरवण्यासाठी सर्वांनी या ठिकाणी आवर्जून यावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.

## चुंबळीच्या सरपंच रेश्मा पवळ सारखा आदर्श इतर गावांतील सरपंचानेही घ्यावा गावातील प्रत्येक मुलींच्या लग्नाला सरपंचा कडून दहा हजारांची मदत

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील चुंबळी गावच्या नवनियुक्त युवा सरपंच डॉ.रेशमाताई पवळ यांनी निवडणुकीत ग्रामस्थांना दिलेला शब्द खरा ठरवत गावातील दिनकर नागरगोजे यांच्या मुलीच्या लग्नासाठी १० हजार रुपयांची मदत केली आहे.नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत डॉ.रेशमाताई पवळ यांनी ग्रामस्थांना प्रत्येक कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी प्रत्येकी १० हजारांची स्वखर्चातून आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता करण्यास त्यांनी आजपासून नागरगोजे कुटुंबाच्या विवाहास मदत करून केली आहे. यापुढे गावातील कोणत्याही आर्थिक दुर्बल व सर्व कुटुंबातील मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकी दहा हजारांची स्वखर्चातून मदत करणार असल्याचे सरपंच डॉ.रेशमाताई पवळ यांनी म्हटले आहे.



# गोरक्षनाथ टेकडी आणि खंडेश्वरी देवस्थान साठी पाच कोटी रुपयाचा निधी मंजूर

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नाला यश

बीड।प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील गोरक्षनाथ टेकडी आणि बीड शहरातील ग्रामदेवता म्हणून ओळखली जाणारी खंडेश्वरी देवीच्या देवस्थानसाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे या दोन्ही देवस्थानच्या विश्वस्त मंडळांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता हा निधी मंजूर झाल्यामुळे देवस्थानच्या विकास कामात भर पडणार आहे

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे सातत्याने विविध विकास कामांचे प्रस्ताव दाखल करून त्यासाठी मंत्रालयात पाठपुरावा करत असतात त्यापैकीच बीड तालुक्यातील दोन देवस्थान साठी पाच कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला आहे बीड पासून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पदावर असतानाही त्यांनी विविध विकास कामासाठी निधी उपलब्ध करून दिला होता तर गेल्या काही महिन्यात झालेल्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्त त्यांनी या देवस्थानच्या विकासासाठी आपण प्रयत्न करून निधी मंजूर करून आणू असे आश्वासन दिले होते त्यानंतर यासाठी त्यांनी एक कोटी ६४ लाख रुपयांचा प्रस्ताव दाखल केला होता या प्रस्तावात एक कोटी रुपये मंजूर झाले असून बीड शहरातील ग्रामदैवत असलेल्या श्री खंडेश्वरी देवस्थानच्या विकास कामासाठी चार कोटी मंजूर झाले आहेत गोरक्षनाथ टेकडी देवस्थान येथे सभामंडप आणि इतर कामे होणार असून बीड येथील खंडेश्वरी मंदिर परिसरात पर्यटन तीर्थक्षेत्र विकास कामांतर्गत प्रसादालय, सांस्कृतिक सभागृह, भिंत बांधकाम,अंतर्गत बांधकाम, नाली बांधकाम, वाहनतळ, विद्युत तळ,पाणीपुरवठा व स्वच्छतेची कामे, अग्निप्रतिरोधक, आदी विकास कामे केली जाणार आहेत या दोन्ही देवस्थानच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली असून याबाबत निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, देवस्थानच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे ह भ प नवनाथ महाराज ढेकणमोहकर व भक्तगण तसेच खंडेश्वरी ट्रस्टींच्या वतीने जेष्ठ संपादक नामदेवराव क्षीरसागर, राणा चव्हाण,राजेंद्र बनसोडे,सुरेश बनसोडे,सम्राट चव्हाण,राजू लोळगे,बंडू खनाळ, विकास गाडेकर,अंबादास गुरव,किसन चव्हाण,विक्रम चव्हाण यांनी अण्णांचा सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत



# अनधिकृत चंदन तस्करी

## लाखोंचा ऐवज जप्त

परळी / प्रतिनिधी

**परळी तालुक्यातील ब्रम्हवाडी शिवारात अनधिकृतपणे चंदनची तस्करी होत असल्याच्या खबरीवरून परळी ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी छापा मारला असता हजारो रुपयांच्या चंदनसह लाखोंचा ऐवज पोलिसांनी जप्त केला.पोलिसांना पाहून आरोपितांनी घटनास्थळावरून पळ काढला असून या प्रकरणी ग्रामीण पोलीस तपास करत आहेत.**

**पोलिसांचा छापा**

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार दिवाळी पाडव्यादिवशी परळी शिवारात असलेल्या ब्रम्हवाडी शिवारात अनधिकृत चंदनाची तस्करी होत असल्याच्या खबरीवरून ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी छापा मारला.पोलीस आल्याचे पाहून आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.या छापमारी मध्ये ग्रामीण पोलिसांना चंदणाच्या झाडाची तोडणी करून झाडाच्या खोड तासुन त्याचा १० किलो गाभा अंदाजे ४० हजार रु, दोन पारडे,वाक्स,युनिकॉर्न,पॅशन, व शाईन या कंपनीच्या मोटारसायकली असा सुमारे २ लाख १६ हजार ५५० रुपयांचा ऐवज जप्त केला.या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्मचारी परतवाड यांच्या फिर्यादीवरून गुरन ३३४/२०२३ कलम ३७९,३४ भादवीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे कर्मचारी केकान हे करत आहेत.

## लोकशाहीर युवा प्रतिष्ठानच्या वतीने आद्य क्रांति पिता लहुजी वस्ताद साळवे यांची
# जयंती मोठ्या उत्साहात साजरी



प्रतिनिधी/ पैठण

तालूक्यातील हिरडपूरी या गावी क्रांती वीर लहूजी वस्ताद साळवे यांची जयंती लोकशाहीर युवा प्रतिष्ठान च्या वतीने मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. जयंती निमित्त गावातील सरपंच भागवत पाटिल तांबे , उपसरपंच नसिर भाई शेख, रेनुका देवी सां कारखाना संचालक नितिन तांबे पाटील, जिल्हा उपाध्यक्ष पँथर,मुख्तार जाघिदार, वाईस चेरमन अजिंठा अर्बन इंकार सय्यद, पोलीस पा.सुनिल खामकर, मुनीर शेख, जी .प .पा. शाळेतील मुख्याध्यापक सुखदेव सर,जयंती चे उपाध्यक्ष:अजय हतांगळे,विशाल गायकवाड, मयनु शेख दिपक इंगावले, किरुभान हतागळे, राहुल इंगावले,राजू हतागळे, राहूल रोकडे,अविनाश विष्णु हतागळे, योगेश हतागळे, लिंबाजी हतागळे,अविनाश कृष्णा हतागळे, सुमित थोरात भिमराव मोरे, रवींद्र हतागळे,सोमा हतागळे व गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.



लिंबागणेश:- बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती मंदिरात दिपावली पाडव्यानिमित्त दि.१४ मंगळवार रोजी सायंकाळी ६ वाजता ५ हजार दिप प्रज्वलीत करून दिपोत्सव साजरा करण्यात आला. गणपती मंदिरांचे प्रवेशद्वार, प्रदक्षिणा मार्ग, दिपमाळ,चंद्रपुष्करणी तिर्थ परीसरात दिव्यातुन गणपती, स्वस्तिक, त्रिशुळ आदि कलाकुसर साकारण्यात आली होती.दिपोत्सवाचा सुखद क्षण अनुभवण्यासाठी गणेश भक्तांनी मोठया प्रमाणावर उपस्थिती दर्शविली होती. या उपक्रमाचे आयोजन भालचंद्र गणपती मंदिराचे पुजारी श्रीकांत जोशी,वरदराज जोशी,सुंदरभाऊ वाणी,जम्मनतात्या कांबळे आणि गणेशभक्तांनी केले होते. आरतीनंतर मिठाईचे वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी दैनिक दिव्य मराठी ब्युरो चीफ दिनेश लिंबेकर, बाळासाहेब मुळे,चिंतामण जोशी यांची समयोचित भाषणे झाली. डॉ.गणेश ढवळे यांनी आयोजक आणि गणेशभक्तांचे आभार मानले.



# तलवाडा येथे क्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे यांची जयंती साजरी

तलवाडा प्रतिनिधी आद्य क्रांतिगुरु

लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन केले. या अभिवादन कार्यक्रमाला सरपंच विष्णू होत्ते, प्राध्यापक श्याम कुंड, पत्रकार बापू गाडेकर, पत्रकार तुळशीराम वाघमारे, पत्रकार विष्णू राठोड, माजी सभापती गीताराम डोंगरे, शिवसेना नेते गोविंद, मुख्याध्यापक विजय डोंगरे सर, जोशी,मानवी हक्क अभियानाचे तालुकाध्यक्ष धोंडीबा हातागळे, डीपीआय चे मदन हातागळे, ग्रामपंचायत सदस्य शहादेव साबळे ग्रामपंचायत सदस्य रवी गांजले, दत्ता हात्ते,रफिक शेख, अरुण डोंगरे, संजय हातागळे, शहादेव रोकडे, साहेबा कुराडे,काकूराम कांबळे, दिलीप हातागळे आणि आणि गावातील पदाधिकारी उपस्थित होते.

# निळ्या झेंड्याच्या सन्मान व अस्मितेसाठी बहुजन जनता दलाचे राज्यस्तरीय संकल्प अभियान

## पंडितभाऊ दाभाडे यांचा २० नोव्हेंबर पासून राज्यात दौरा

**पुणे :आपल्या स्वार्थी राजकारणासाठी रिपाईच्या सर्व गटाच्या नेत्यांनी आणि आंबेडकरवादी सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी निळ्या झेंड्याची अस्मिता व सन्मान हा राज्यातील भाजपा. शिवसेना( शिंदे गट) शिवसेना (ठाकरे गट )काँग्रेस .मनसे .राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट )राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या राजकीय पक्षाच्या दावणीला बांधून रिपाई चे सर्वच गटाचे नेते आपल्या स्वार्थी राजकारणासाठी या निळा झेंडाचा उपयोग निवडणुका मोर्चे आंदोलन याच्या मर्यादित ठेवून रिपाई नेते स्वार्थासाठी राजकारण करीत आहे त्यामुळे राज्यात आंबेडकर आणि रिपाई चळवळ अस्तित्वात पाहायला मिळत नसून राजकीय व सामाजिक क्षेत्रात निळ्या झेंड्याचा सन्मान व अस्मिता शिल्लक राहिलेली नाही**

निळ्या झेंड्याचा सन्मान व अस्मितेसाठी बहुजन जनता दल आता निळ्या झेंड्याची अस्मिता व सन्मान धुळीत मिळवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या व नेत्यांच्या विरोधात रस्त्यावर उतरण्यासाठी बहुजन जनता दलाचे संस्थापक अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरवादी समाज दलित बहुजन अल्पसंख्यांक वंचित यांच्यासह सर्वच घटकातील समाजातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी राज्यस्तरीय निळा झेंडा अस्मिता व सन्मान संकल्प




अभियानाचे आयोजन सविधान दिन रविवार २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारीपर्यंत आयोजन करण्यात आले आहे सदर तीन महिन्यात चालणाऱ्या अभियानामध्ये जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय निळा झेंड्याच्या अस्मितेसाठी सन्मानासाठी बैठकांचे आयोजन करण्यात येणार असून या बैठकामध्ये निळ्या झेंडाच्या अस्मितेसाठी व सन्मानतेसाठी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार असून याकरिता बहुजन जनता दलाचे संस्थापक अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांचा २०नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर पर्यंत राज्यस्तरीय दौरा असून संविधान दिन २६ नोव्हेंबर बहुजन जनता दलाचे निळा झेंड्याच्या सन्मान व समितीसाठी संकल्प राज्यस्तरीय अभियान विदर्भातील अकोला शहरातील अशोक वाटिका येथे संविधान दिन २६ नोव्हेंबर पासून अभियानाला प्रारंभ करण्यात येणार आहे तेव्हा राज्यातील बहुजन जनता दलाच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी जिल्हा व तालुका बैठका घेऊन बैठकामध्ये येणाऱ्या नागरिकांना निळा झेंडाच्या सन्मान व अस्मितेसाठी त्याच्या मनात आदर्श निर्माण करून जनजागृती करून मार्गदर्शन करावे असे आव्हान बहुजन जनता दलाचे संस्थापक अध्यक्ष पंडितभाऊ दाभाडे यांनी वरील दिलेल्या प्रसिद्धी पत्रकार कळविलेले आहे

# अंबड येथील महाएल्गार सभेला सकल ओबीसी बहुजन समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे - बापू गाडेकर

गेवराई (प्रतिनिधी)

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संवेधानिक मार्गाने आपल्या अधिकाराची मागणी करण्यासाठी शुक्रवार दि.१७ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ठिक ११ वाजता जालना जिल्ह्यातील अंबड येथे सर्व ओबीसी नेत्यांच्या उपस्थितीत महाएल्गार सभा होणार असून या सभेला गेवराई तालुक्यातील सकल ओबीसी बहुजन समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बापू गाडेकर यांनी केले आहे.



जालना जिल्ह्यातील अंबड येथे ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी तसेच जातीनिहाय जनगणना व इतर मागण्या शासनाने मान्य कराव्यात यासाठी शुक्रवार दि.१७ नोव्हेंबर रोजी महाएल्गार सभा होणार असून या सभेला संबोधित करण्यासाठी ना.छगनरावजी भुजबळ साहेब, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजीमंत्री पंकजाताई मुंढे, कृषीमंत्री धनंजय मुंडे, माजीमंत्री महादेव जानकर, आ. गोपीचंद पडळकर, माजी आ.प्रकाश अण्णा शेंडगे, माजी आ.हरिभाऊ राठोड यांच्यासह ओबीसी समाजाचे इतर मान्यवर नेतेमंडळी उपस्थित राहणार आहेत. तरी गेवराई तालुक्यातील सर्व ओबीसी बहुजन समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रा.पि.टी.चव्हाण, सुघोष मुंढे, बापू गाडेकर, गजानन काळे, परमेश्वर महाराज वाघमोडे, अंबादास बाबा पिसाळ, दादासाहेब चौधरी, अण्णासाहेब राठोड यांच्यासह सकल ओबीसी समाजाच्या विविध पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## चुंबळी गावच्या सरपंच रेशमा पवळ यांचा
# आदर्श इतर गावांतील सरपंचानेही घ्यावा

### गावातील प्रत्येक मुलींच्या लग्नाला सरपंचा कडून दहा हजारांची मदत

पाटोदा (दत्ता वाघमारे)

पाटोदा तालुक्यातील चुंबळी गावच्या नवनियुक्त युवा सरपंच डॉ.रेशमाताई पवळ यांनी निवडणुकीत ग्रामस्थांना दिलेला शब्द खरा ठरवत गावातील दिनकर नागरगोजे यांच्या मुलीच्या लग्नासाठी १० हजार रुपयांची मदत केली आहे.नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत डॉ.रेशमाताई पवळ यांनी ग्रामस्थांना प्रत्येक कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी प्रत्येकी १० हजारांची स्वखर्चातून आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले होते.या आश्वासनाची पूर्तता करण्यास त्यांनी आजपासून नागरगोजे कुटुंबाच्या विवाहास मदत करून केली आहे.यापुढे गावातील कोणत्याही आर्थिक दुर्बल व सर्व कुटुंबातील मुलीच्या



विवाहासाठी प्रत्येकी दहा हजारांची स्वखर्चातून मदत करणार असल्याचे सरपंच डॉ.रेशमाताई पवळ यांनी म्हटले आहे.

# बीपिल सीजन सिक्स या क्रिकेट महासंग्रामामध्ये रासप चुरशीच्या लढतीत

बीड ।अंकुश गवळी

छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा स्टेडियम वरती १५/११/२०२३ रोजी झालेल्या टी ट्रेन्टी क्रिकेट मॅच मध्ये सकाळच्या सत्रात स्वराज्य रासप स्ट्राईकर्स विरुद्ध पॉवर केअर स्ट्राईकर्सया झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना स्वराज्य रासप स्ट्राइकर्स यांनी वीस ओव्हर मध्ये १७२ धावा केल्या ज्यामध्ये निशांत मस्के या सलाम वीराने उत्कृष्ट फलंदाजी करत ४४ चेंडूत ५१ धावा ज्यामध्ये सहा चौकार आणि एक षटकार मारून सुरुवात चांगली दिली तसेच शेवटी सोनू चौधरी विठ्ठल शिराळे यांनी प्रत्येकी ४१ (२१) व २२(१८ )धावा केल्या १७३ भावांचा पाठलाग करत असताना पावर केअर स्ट्रायकर्स यांच्याकडून नवीद याने सर्वाधिक ३७ धावा केल्या तसेच शेवटी बन्सी जोगदंड

## स्वराज्य रा.स.प. स्ट्राईकर्स चा विजय



यांनी १५ बॉल मध्ये ३४ धावा करून मॅच मध्ये चुरस निर्माण केली व शेवटच्या शटकामध्ये सहा बॉल चार रन अशी सिच्युएशन असताना स्वराज्य रा स प स्ट्रायकर्सच्या वेगवान गोलंदाज संतोष कुराडे याने शेवटच्या शटकात दोन गडी बाद करून चार धावा रोखल्या आणि चुरशीच्या लढतीत स्वराज्य रा स प स्ट्रायकर्स चा दोन धावांनी विजय झाला

या सामन्याची नाणेफेकस्वराज्य रा स प स्ट्रायकर्स चे मालक अण्णासाहेब मतकर राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आला तसेच त्यांनी सामना जिंकल्याबद्दल संघाला खूप खूप शुभेच्छा दिल्या सामन्याचा आनंद घेण्यासाठी स्वराज्य रासप स्ट्रायकर्सचे स्पॉन्सर काशीद कोचिंग क्लासेसचे संचालक परशुराम काशीद तसेच युवा मल्हार सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू दादा देवकते राष्ट्रीय समाज पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष तुषार उंबरे उपस्थित होते

# नवी उमेद,नवी आशा घेऊन चाहत्यांनी केला शुभेच्छांचा वर्षाव

## माजीमंत्री जयदत्त क्षीरसागरांच्या पान सुपारी कार्यक्रमात जिल्हाभरातून उपस्थिती

बीड/प्रतिनिधी

विजयादशमी नंतर काल दीपावली पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आयोजित केलेल्या पान सुपारी च्या कार्यक्रमात चहात्यांची अलोट गर्दी उसळली होती नवी उमेद नवी आशा घेत चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून आणि जिल्ह्याच्या बाहेरून मोठ्या संख्येने चाहता वर्ग उपस्थित होता

दीपावली पाडव्यानिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी पान सुपारी चा कार्यक्रम आयोजित केला होता मेडिकल कॉलेजच्या मैदानात झालेल्या कार्यक्रमात विजयादशमीच्या दिवशी आलेल्या चाहत्यांपेक्षा दुप्पट गर्दी उसळली होती संध्याकाळी सहा वाजता सुरू झालेला कार्यक्रम दहा वाजेपर्यंत सुरू होता. बीड मतदार संघ जिल्ह्यातून आणि जिल्ह्याच्या बाहेरून माजीमंत्री क्षीरसागर यांचा चाहता वर्ग उपस्थित होता, आलेल्या प्रत्येकाला भेटून माजीमंत्री क्षीरसागर यांनी शुभेच्छा देत दीपावली पाडवा साजरा केला,विजयादशमी नंतर मध्यंतराच्या कालावधीत झालेल्या जाळपोळ घटनेमुळे अनेकांनी आपल्या नेत्याची भेट घेत यापुढील काळात पुन्हा एकदा जोमाने काम करू आणि येणाऱ्या काळात आम्ही अण्णांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा विश्वास व्यक्त केला,यावेळी आ सुरेश धस, यांच्यासह माजी आमदार,जि प सदस्य,प स सदस्य, नगरसेवक,विविध समाजातील प्रतिष्ठित नागरिक,डॉक्टर,वकील,

संपादक,पत्रकार,व्यापारी,

सामाजिक कार्यकर्ते,आणि विविध संघटनांचे पदाधिकारी,विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते,याचवेळी बीड मतदार संघातील १३ ग्रामपंचायत च्या नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच सदस्यांचा माजीमंत्री क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तर श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी आणि श्री खंडेश्वरी देवस्थानच्या विकासासाठी एकूण ५ कोटींचा निधी मंजूर करून आणल्याबद्दल देवस्थानच्या ट्रस्टी आणि भक्तांच्या वतीने अण्णांचा सत्कार करण्यात आला





**श्रीक्षेत्र भगवानगड व माझे आई-वडील काकू नाना यांची गुरु शिष्य परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून चालत आलेली आहे अनेक वर्षापासून मनामध्ये भगवान बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याची इच्छा होती आज ती प्रत्यक्षात आली विशेष म्हणजे भगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांचे ज्ञानेश्वरी वरील चिंतन व दोन्ही परिवाराची पारंपारिक चालत आलेली गुरु शिष्य पार्श्वभूमी यावर मुक्त चर्चा झाली श्रीक्षेत्र भगवानगडाचा झालेला कायापालट विकासात्मक दृष्टीला प्रेरणा देणारा आहे हे सर्व पाहून नक्कीच समाधान असल्याचे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले.**

# आलबेला सजन आयो रे

## अहिर भैरवच्या स्वरांनी रंगली 'रसिक'ची पाडवा पहाट

बीड/वार्ताहर

पं. कैवल्यकुमार गुरव यांच्या गायनाने बीडकर श्रोत्यांना पाडव्याच्या पहाटे आपल्या तयारीच्या गायनाने मंत्रमुग्ध केले,भल्या पहाटे गायन ऐकण्यासाठी आतुर असलेल्या रसिकांना त्यांनी अहिर भैरव ऐकवला अन श्रोते मंत्रमुग्ध झाले,प्रतिवर्षीप्रमाणे रसिक फाउंडेशन, बीडच्या वतीने या मैफिलीचे आयोजन करण्यात आले.येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात

पं. कैवल्यकुमार गुरव यांनी राग अहिर भैरवने आपल्या गायनाचा प्रारंभ केला, विलंबित,मध्यलय त्रिताल आणि द्रुत एकतालात त्यांनी हा पहाटेचा राग रंगवला, ख्याल गायनाचे वैशिष्ट्य त्यांनी



प्रात्यक्षिकासह सादर करून श्रोत्यांना अनोखी अनुभूती दिली.राग भटियार मधील एक द्रुत रचना ,'सावरे आयजययो' ठुमरी दादरा सादर करून त्यांनी श्रोत्यांची पकड घेतली.'बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल' हा संत तुकारामांचा अभंग आणि 'शुरा मी वंदिले 'हे संगीत मानापमान मधील नाट्यपद कमालीचे रंगवले.आपल्या गायनाची सांगता त्यांनी ' भाग्यदा लक्ष्मी बारम्मा' संत पुरंदरदास यांची कानडी रचनेनी केली.त्यांना तबल्यावर श्रीधर मांडरे आणि हार्मोनियमवर अनय घाटे ,तानपुऱ्यावर विशाल मारगुडे यांनी सुंदर साथ केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर यांनी तर प्रास्ताविक राम मोटवाणी आणि पारस बोरा यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रसिक फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.अनुराग

पांगरीकर,संस्थापक अध्यक्ष अमर डागा,उपाध्यक्ष महेश वाघमारे, सचिव मिलिंद सुंदर,कोषाध्यक्ष विकास उमापूरकर,प्रदीप मुळे डॉ प्रसन्न कुलकर्णी,वाय जनार्धन राव,विष्णूदास बियाणी सी ए गोपाल मालू दीपक कर्णावट ईश्वर मुथा,सुदर्शन धुतेकर डॉ.अनिल बारकुल आणि राजेंद्र मुनोत यांनी परिश्रम घेतले. रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनगर आरक्षणाला विरोध करणारे गुणरत्न सदावर्ते राज्यकर्त्यांचे दिवाण आहेत का?दत्ता वाकसे

बीड ।प्रतिनिधी

मराठा समाजातील आरक्षणाच्या विरोधानंतर आता गुणरत्न सदावर्ते यांनी धनगर समाजाच्या आरक्षणाला विरोध केलाय. मराठा आरक्षणावर बोलताना गुणरत्न सदावर्ते यांनी सरसकट कोणत्याही जातीचा प्रवर्ग बदलता येत नाही, हे सांगताना धनगर धनगड या शब्दांचं उदाहरण त्यांनी दिलं. तर कोळी समाजाला असलेल्या एसटी प्रमाणपत्राचा दाखला दिला. यावरून राज्यकर्त्यांनी गुणरत्न सदावर्ते यांना दिवाण म्हणून नेमलंय का असा सवाल शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी उपस्थित केलाय. तसंच धनगरांना आरक्षण देण्याची ग्वाही देणाऱ्या भाजपनं यावर स्पष्टीकरण करण्याचं आव्हन केलंय. तर २०१४ मध्ये झालेल्या पहिल्याच कॅबिनेट बैठकीत धनगरांना आरक्षण मंजूर करण्याची हमी फडणवीस यांनी दिली होती. मात्र अद्याप त्यांनी एसटीतून धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी मिळालेलं प्रमाणपत्र आत्तापर्यंत दिलेलं नाही. वकील गुणरत्न सदावर्ते हे वेळोवेळी प्रत्येक समूहाच्या समाजाच्या आरक्षणाच्या विरोधामध्ये वक्तव्य करून स्वतःची प्रसिद्धी करू पाहतात आहेत काय? त्यांना त्या पद्धतीने उत्तर राज्यातील धनगर समाज देईल वेळोवेळी प्रत्येक समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न उद्भवल्या.नंतर प्रत्येक वेळी विरोधी वक्तव्य करून स्वतःची प्रसिद्धी करून घेण्याचं काम वकील गुणरत्न सदावर्ते करत आहेत. त्यांनी भारतीय राज्यघटनेचा कलम ३४२ अन्वये क्रमांक ३६ यासह धनगर आरक्षणाच्या मुद्द्याला नीट अभ्यासपूर्वक वाचन करावे आणि त्यानंतर वक्तव्य करावे अन्यथा आगामी काळात गुणरत्न सदावर्ते



यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील धनगर समाज हा पूर्वीपासूनच एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या यादीमध्ये समाविष्ट आहे या समाजाची फक्त अंमलबजावणी करायची आहे परंतु हा विरोध दर्शवणे म्हणजे स्वतःची प्रसिद्धी करून घेणे यासाठीच हा व्याप करताना गुणरत्न सदावर्ते दिसत आहेत त्यामुळे गुणरत्न सदावर्ते यांनी राज्यातील दोन कोटी धनगर समाजाची तात्काळ माफी मागावी अन्यथा गुणरत्न सदावर्ते यांना रस्त्यावर फिरू देणार नसल्याचे. शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी म्हटले आहे

धनगरचा घनगड असा शासन प्रशासनातील चुकीच्या अर्थामुळे व केवळ शाब्दीक अपभ्रंशाचा शिकार धनगर समाज झाला आहे. जागृत समाज कार्यकत्यांनी वेळोवेळी महाराष्ट्र शासनाकडे निवेदने दिली. मोर्चे काढले, आंदोलने केली; परंतु समाजाच्या असंघटीतपणामुळे व सक्षम नेतृत्वाच्या अभावामुळे आजपर्यंत धनगर समाजाला एस.टी.ची सवलत मि ळाली नाही. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाचे मराठीमधील राजपत्र भाग ४, म, पृष्ठ क्र. ३२४, ३२८ वर दि. १५ मार्च २००१ रोजी न.टी.ई.सी.एस. १४७. २०३०१, बो.ए. २००३-२००५ या पत्रकात ३६ वर धनगर या मराठी शब्दाचा स्पष्ट उल्लेख आहे. राजपत्राम ध्ये संविधान कलम ३४२ नुसार अनुसूचित जमातीच्या एकूण १ ते ४७ क्रमांकात जात विभागणी केली आहे. त्यामधील ते ३५ क्रमांकांना अनुसूचित जमातीच्या सर्व सवलती दिल्या जातात, पण त्याच राजपत्रातील क्र. ३६ वर धनगड या जातीचा समावेश असूनही त्यांना मात्र शासन प्रशासनातील धनगरचा घनगड असा चुकीचा अर्थ घेऊन अनुसूचित जमातीच्या सवलती नाकारले आहेत. आणि १७ जानेवारी १९९० ला या समाजाला एन.टी. या प्रवर्गात टाकले. आमचा आणि एनटी आरक्षणाचा कसल्याही प्रकारचा संबंध नाही आम्हाला विनाकारण फसवण्याचे काम पूर्वीचा राज्यकर्त्यांना केला आहे असेही वाकसे म्हणाले



संगम वाडी पुणे लहुजी वस्ताद साळवे यांच्या समाधी स्थळ जयंती महोत्सव याठिकाणी उपस्थित राहून लहुजी वस्ताद साळवे याना अभिवादन केले यावेळी डॉ मिलिंद आवाड व समाज बांधव उपस्थित होते.

## क्रांतीगुरु लहुजी साळवे यांच्या २२९ व्या जयंती उत्सवात साजरी करण्यात आली

यावेळी लहुजी साळवे जयंतीच्या अध्यक्ष गृहनिर्माण व ओबीसी कल्याण मंत्री मा. ना .अतुलजी सावे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री मा. ना. डॉ भागवतजी कराड, यांच्या हस्ते लहुजी साळवे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली .याप्रसंगी डॉ.रमेश पांडव यांनी लहुजी साळवे यांच्या जीवन चरित्रावर उपस्थितातांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रांत संघचालक अनिलजी भालेराव,भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस श्री .संजय केनेकर, शहर जिल्हाध्यक्ष श्री शिरीष बोराळकर, सरचिटणीस श्री



जालिंदर शेंडगे, श्री शिवाजी दांडगे,प्रदेश सचिव श्री किरण पाटील, शालिनीताई बुंदे, महिला मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मीना मिसाळ, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र एडके, प्रदेश सचिव योगेश दणके, शहर जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण शिंदे, सचिन बाविस्कर, मच्छिंद्र कांबळे, उपाध्यक्ष उज्वलाताई दहिफळे, माधुरी आदवत, ज्योती जाधव, कल्पना त्रिभुवन, हडको मंडळ अध्यक्ष सागर पाले, नितीन खरात, सतीश खेडकर यावेळी आदी पदाधिकार उपस्थित होते




आज सताळा साठे नगर येथे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले या वेळी मा दिपक सुर्यवंशी (अध्यक्ष) यांच्या हस्ते प्रथमेस पुष्पहार घालून पूजन करण्यांत आले यावेळी लोकनायक संघटना सताळा टिम ग्राम पंचायत सताळा सदस्य दत्ता खंदाडे बालाजी खलसे नामदेव खलसे शिवा खलसे गोविंद वाघमारे लहु वाघमारे गजाजन कांबळे अंकुश वाघमारे सोमा खलसे काना वाघमारे सचिन सुर्यवंशी संतोष खलसे सर्व लहु प्रेमी उपस्थित होते

## सुशी येथे बदलमशहा याच्या उरुस निमित्त यात्रा



गेवराई : गेवराई तालुक्यातील सुशी (वडगांव) येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लीम एकतेचे प्रतिक असलेल्या हजरत किबला सय्यदशहा बदलमशहा (रहेमतुल्लाह अलईह) दर्गाहच्या उरुस निमित्त बुधवार, दि.१५ नोव्हेंबर रोजी संदल निमीत्त गावातुन बदलमशहा यांची छबीना मिरवणूक तर गुरुवार, दि.१६ व शुक्रवार दि.१७ रोजी दोन दिवसीय उरुस व यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी यात्रेकरूंनी या यात्रोत्सवात बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सुशी येथील संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. आगळा-वेगळा उत्सवात उत्सव म्हणजे उरुस व यात्रोत्सव होय. दिवाळीची अमावस्या होवून जो बुधवार येतो, त्या दिवशी सुशी वडगाव येथे संदल मिरवणूक होऊन यात्रेला प्रारंभ होतो. तर बुधवार, दि.१५ नोव्हेंबर रोजी हजरत किबला सय्यदशहा बदलमशहा (रहेमतुल्लाह अलईह) यांच्या उरूस निमित्त गावातुन हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संदल मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत सुशी येथील गांवकरी तसेच वडगांव, चिखली, सिंदखेड, कवडगांव, बंगालीपिंपळा, कोळगाव, मादळमोहीसह अन्य ठिकाणाहूनही लोक मोठ्या संख्येने सहभागी होतात. तर गुरुवार हा यात्रेचा दुसरा दिवस, म्हणजे बच्चे कंपनीचा मौजमजा करण्याचा दिवस असतो. या ठिकाणी गेवराई, मादळमोही, सिरसदेवी, गढी, उमापूर, सिरसमार्ग येथील कापड दुकानदार, हॉटेल चालक व खेळण्याचे व्यापारी आवर्जून हजेरी लावून आपपली दुकाने थाटतात. उरुसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मिरवणूक व यात्रोत्सवात यात्रेकरूसह परिसरातील नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजन समिती व सुशी ग्रामस्थांच्या वतिने करण्यात आले आहे.



बोरखेड ग्रामपंचायत च्या वतीने लहुजी साळवे यांची जयंती साजरी करण्यात आली लहुजी साळवे चौक बोरखेड या ठिकाणी लहुजी साळवे जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले



आज पाडव्यानिमित्त बीड राष्ट्रवादी भवन येथे आमदार रोहित दादा पवार व आमदार संदीपभैय्या क्षीरसागर यांना शुभेच्छा देतांना मी, व राजाभाऊ साळुंके, व माझा मुलगा श्लोक




समाज एकत्र नसतो त्याला कोणीही येता-जाता टपली मारतच असतो.. बिहारात भूमिहारांची संख्या तीन टक्केसुद्धा नाही, तरीसुद्धा कोणी त्यांच्या वाटेला जात नाही.. कारणं टक्के महत्वाचे नाहीत तर तुम्ही किती पक्के आहात हे महत्त्वाचं..मातंग युवा जोडो अभियान महाराष्ट्र,



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

वसुंधरा सेवा प्रतिष्ठान आयोजित बॉम म्युझिक स्कूल व शाहीर तुकाराम सुवर्णकार प्रस्तूत महाराष्ट्राची लोकधारा 'दिवाळी पहाट-२०२३' कार्यक्रम मंगळवारी पहाटे संपन्न झाला. शहरातीलआद्यकवि मुकूंदराज स्वामी सांस्कृतिक सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात आ.नमिता मुंदडा व अक्षय मुंदडा, सारंग पुजारी,रोहिणी पाठक यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.यावेळी अनेक रसिकांनी उपस्थित राहून तुकाराम सुवर्णकार आणि ओंकार रापतवार नंदीनी कूलकर्णी,कपिल देशपांडे व इतर गायकांच्या गाण्यांच्या सुरेल मैफिलीचा आनंद लुटला. कार्यक्रमाच्या प्रास्तविकातून ताल मार्तंड प्रकाश बोरगांवकर यांनी सांस्कृतिक उपक्रमाची माहिती दिली.

## आर्वीत जनहित कार्यकर्ते पराभुत

### संगीता लक्ष्मण मस्के येणाऱ्या काळात महिलांना सोबत घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणार

बीड ।अंकुश गवळी

शिरूर कासार तालुक्यातील आर्वी ग्रामपंचायत हि ओबीसी महिला सरपंच पदासाठी राखीव असल्याने.समाजीक कार्यात सतत १५ वर्षांपासून सक्रीयपणे काम करणारे बहुजन चळवळीतील नेते लक्ष्मण मस्के व त्यांच्या अर्धांगीणी सौ संगीता मस्के ह्या दांपत्यांनी आर्वी गावातील जनतेसाठी खुप मोठे यौगदान दिले आहे. ७ कोटी रुपयाची ठिंबक



सिंचन यौजना राबवुन सहा महिण्यानी ३ कोटी रू सबसिडी मिळुन . नंतरच्या काही काळात संपूर्ण कर्जमाफी.आसे दहा कोटी रुपये जनता फायद्यात आणली.६८ शौचालय धारकांना स्वछ्य भारत अंतर्गत प्रत्येकी ४६०० रू प्रमाणे ३१२८०० रू मदत मिळुन दिली.७० निराधार जनतेला श्रावणबाळ यौजने अंतर्गत तहशिल माध्यमातून मानधन सुरू करून दिले.

बँक माध्यमातून २०० लोकांना लाखों रू पिककर्ज दिले.तहशिल पंचायत समिती कृषी कार्यालय माध्यमातून सतत जनतेच्या हितासाठी योजना मिळुन देण्यासाठी सतत कार्यरतपणा.सौ संगीता मस्के यांनी ४७ महिला बचत गटाची निर्मीती करून ३ कोटी रुपये फिरत भांडवल निर्माण केले.आसे अनेक जनहितार्थ कार्य करून देखील जनतेने अशा लढाऊ कार्यकर्त्यांचा आर्वी ग्रामपंचायत निवडणुकीत पराभव झाल्याने गावसहीत तालुक्यातील जनतेत मोठे दूखख व्यक्त करण्यात येत आहे.

# देशातील ४० लाख माजी सैनिक व ५ करोड़ सैनिक परिवार आन्ना हजारे

## याच्या आशिवावादे मार्गदर्शनाने जनतेच्या हितासाठी कार्य करणार, माजी सैनिक नरायण आंकुशे

पाटोदा ।प्रतिनिधी

लाल बाहदुर शास्त्री जी ने जय जवान जय किसन हा नारा दिला होता. परंतु आज हि परिस्थीती आहे की सैनिकांने सिमेवर मरायचे आणि शेतकन्याने शेतात राबून मरायचे - कोनतेति सरकार सैनिकांच्या, शेतकयांच्या सर्वसामान्याच्या प्रश्नावर गर्भभौर नाही. मात्र स्वामीनाथन आयेग शेतकर्याच्या पिकाला हमी भाव लावण्याकरता कीतीतरी वेळेस स्वामी नाथन आयोग लागू करण्यासाठी शेतकर्य ने कितीतरी वेळा आंदोलन केलें परंतु सरकारने त्यानं गाभिर्याने नाही घेतले सरकारने यावर विचार केला नाही आज शेतकयाची बीकट परीस्थती निर्माण झाली आहे कि शेतकरी कर्जामधे डुंबत चालेला आहे. शेतीमालाला भाव नाही. दुधालातर पाण्याच्या किमतीपेक्षा कमी भाव शेतकन्याला मिळत आहे. पाण्याच्या बाटलीची किंमत ८ रुपय आणि विक्री किंमत २५ रु परंतु शेतकन्याच्या लिटर ला लागत किंमत ५० रु आणि शेतक-या मिळनारा मोबदला २८ रु आहे. हि खुप मोठी फसवणूक व अन्य आमच्या शेतक-यावर आहे. ज्या सैनिकांनी भाजपला पाठिबा दिला त्याच भाजपच्या सरकारणे सैनिक जठजझ साठि २८५दिवस झाले तेथे कोणी सरकारल्या वतीने बोलयला पण आले नाहीत. आदरणीय पंतप्रधान दिवाळी सैनिकामध्ये जाऊन साजरी करतात आणि इकडे सैनिकाचे, हाल ऊपीक्षा होते. शिक्षणाचे या सरकारने तीन तेरो केले आहे. आज शिक्षण हे मुलभुत गरज आसुन शिक्षणाचे आर्थिक बोजा विधवाच्या व पालकांच्या डोक्यावरती पडत आहे.

आज नरसरिला ५० हाजार ते लाख रू भरावे लागते. शिक्षण है सर्व सामान्याच्या आढवेच्या बाहेर जात आहे तरी ही सरकार शिक्षणावर गाभीर्य नाही सरकारी शाळा बंद होत चालल्या आहेत. ज्या शाळा राहिल्यात त्याचे सरकार खाजगीकरण करण्याचे प्रयत्न करत आहे. आज भारतामध्ये सर्वसामान्याला न्याय भेटतच नाही., आज विविध कोर्टामधे पाच करोड केसेस प्रलंबीत आहेत. ४० कोटी जनता कितेक वर्षे शक्ति न्यायाच्या प्रतिक्षेत आहे. जनतेला न्यायासाठी कोर्टाच्या फेन्या वर्षाण वर्षे माराव्या लागत आहेत जनता त्रस्त आहे सरकार मस्त आहे.सरकारी कंपन्याचे खाजकिरण झालेले आहे .





रोजगार धोक्यात आला आहे सरकारने जनताला सैनिकांना, विध्याथ्र सर्वसामान्य जनतेला व ग्रहित धरले आहे मुलभुत गरजा अन्न, वस्त्र, निवारा आसून शिक्षण आरोग्य व न्याय देणे सुधा आजच्या काळातिल मुलभूत गरज आहे. त्यावर सरकारचा आणि नेत्याला काहि ही विचार नाही. कोरोनापासून आपल्या तिन तेरा चागल्या आहेत त्यावर सरकारचा अंकुश नाही आरोग्य हे सर्व सामान्य जनतेच्या आवाख्याच्या बाहेर गेलेल विषय आहे. आज सर्व सामान्य जनतेच्या मुलभीत प्रश्न, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य न्याय यावर विचार करण्यापेक्षा सरकार व इतर पक्ष मंदीर मजीस्द मुद्याला जास्त महत्व देत आहेत. आज जनतेमध्ये हया सर्व राजकारणामुळे व्देष निर्माण होत आहे . त्यामुळे आज सर्व जनतेच्या हितासाठी शेतकयाच्या हितासाठी विधवाच्या हितासाठी सर्वसामान्याला न्याय देण्यासाठी देशातिल ४० सैनिक आदनीय आन्नाच्या आर्शिवादने व मार्गदर्शने पुर्ण भारतभर काम करणार आहेत दि १९ नोव्हेंबर वार रविवार राळेगान सिंध्दीला देशातील सर्वप्रमुख सैनिक आशिवाद घेऊन जनकल्याणच्या हितासाठी काम करणार असल्याचे,माजी सैनिक नरायण आंकुशे यांनी म्हटले आहे

# दिपावली पाडव्या निमित्त पावनधाम येथे दिपोत्सव, एकवीस हजार पणत्यांची आरास

## दहा वर्षांपासून महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचा अनोखा उपक्रम

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे संस्थानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या संकल्पनेतून दिपावली पाडव्याच्या निमित्ताने एकवीस हजार दिवे प्रज्वलित करून हजारो भाविकांच्या उपस्थितीत दिपोत्सव साजरा करण्यात आला.

दिपावली पाडव्याच्या निमित्ताने दिपोत्सवाची सुरूवात संत तुकाराम महाराजांच्या आरतीने झाली.यावेळी उपस्थित उद्योजक लक्ष्मण मोरे, हनुमंत मोरे,राहुल भैय्या सोनवणे,सारणीचे सरपंच पती संतोष सोनवणे,

वसंत मोरे,जिल्हा परिषद सदस्य शंकर उबाळे, ज्ञानेश्वर जाधव,पत्रकार शुभम खाडे,बाबा महाराज कदम,भागवत शिंदे, उद्योजक प्रशांतराव निगडे,गणेश महाराज भगत यांच्या शुभहस्ते करण्यात आली.अंधारा तून प्रकाशाकडे जाण्यासाठी प्रत्येकास उर्जा मिळावी यासाठी श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे दिपोत्सव साजरा करण्यात येतो.श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथील दिपोत्सवात यावर्षीतब्बल एकवीस हजार दिव्यांचा दिपोत्सव साजराकरण्यात आला.दिपोत्सवासाठी पंचक्रोशीतील महिलांनी सुबक रांगोळीतून संत तुकाराम महाराज, विठोबाची प्रतिमा रेखाटून उपस्थित भाविकांचे लक्ष वेधून घेतले.यावेळी दिप प्रज्वलित करत



असताना एक दिवा शहिद जवानां साठी,एक दिवा शेतकर्यां साठी,एक दिवा कष्टकर्यां साठी,एकदिवा महिलांच्या सन्मानासाठी,एक दिवा समाज सेवकांसाठी याप्रमाणे दिप प्रज्वलित करण्यात आले.

दिपोत्सवाच्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या भाविकांना मार्गदर्शन करताना महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री म्हणाले कि,दिवा ज्या प्रमाणे अंधार दूर करून प्रकाश देतो त्याच प्रमाणे प्रत्येक व्यक्तीने चांगले कर्म करूनआयुष्य जगावे.पुढे बोलताना ते म्हणाले कि,सत्याचा नेहमीच असत्यावर विजय होतो.दिपोत्सवाच्या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी अमोल महाराज, अशोक महाराज ,हनुमंत सिरसट महाराज,गोविंद शिनगारे,गणपत पांचाळ, उत्तम पारेकर,संस्थानचे सर्व आजी-माजी विद्यार्थी तसेच पंचक्रोशीतील स्वयं सेवकांनी परिश्रम घेतले.

# साहित्य निकेतन, शिवशंभु प्रतिष्ठानच्या वतीने शिवचरित्र चित्र प्रदर्शन

## शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त्याने केले आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील साहित्य निकेतन ग्रंथालय व शिवशंभु विचारदर्शन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवचरित्र चित्रप्रदर्शन व शिवचरित्र पुस्तक प्रदर्शन नुकतेच भरविण्यात आले होते.उद्धघाटन प्रसंगी जेष्ठ विधिज्ञ ड.किशोर गिरवलकर,कापुस पणन महासंघांचे उपाध्यक्ष ड.विष्णुपंत सोंळुके,ड.सुधाकर चिखलीकर,साहित्य निकेतनचे अध्यक्ष दत्तप्रसाद रांदड आदी उपस्थित होते. यावेळीॲड.सोळुंके म्हणाले की,भ्रमणध्वनीचा वाढता वापर आणि तंत्रज्ञानाचा बदलता ट्रेड यामुळे सध्या नव्या पिढीचे वाचन संस्कृतीचे दुर्लक्ष झाले असून नवी प्रणाली विकसित



करून वाचन संस्कृती टिकविण्याचे आव्हान स्विकारले पाहीजे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य स्थापित केले त्यातून सामाजिक समरसता जोपासल्या गेली अलिकडे सामाजिक जाणिवा बोथट झाल्याने सामाजिक आरोग्य धोक्यात आले आहे ते व्यवस्थित ठेवण्यासाठी साहित्य निकेतनचे प्रयत्न दिशादायी असल्याचे मत अँड. गिरवलकर यांनी व्यक्त केले. सुधाकर चिखलीकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक दत्तप्रसाद रांदड यांनी केले.ड.बळीराम पुरी यांनी प्रदर्शनाबाबतची भुमिका सांगितली पाहुण्यांचा परिचय कौस्तुभ कोदरकर, संचालन दत्तप्रसाद गोस्वामी यांनी उपस्थितांचे आभार शंतनु हिरळकर यांनी मानले.यावेळी प्रा.डॉ.शरद हेबाळकर,शरयु हेबाळकर,अरूण देशपांडे,डॉ.गोपाळ चौसाळकर,सुभाष हिवरेकर,राहुल देशपांडे, अमित खडके आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.

## चिंचोटी येथे अखंड हरिनाम सप्ताहस सुरुवात

# ज्ञानेश्वरी पारायन सोहळा व शिवपुरान कथेचे आयोजन

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिपावली पाडव्याच्या शुभ मुहर्तावर आखंड हरिणाम साप्ताहहास मंगळवार दि १४ रोजी सुरुवात झाली या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांचे हजेरी लाभणार आहे व कार्यक्रमांमध्ये दैनदीन कार्यक्रमात सकाळी काकडा भजन,विष्णुसहस्त्रनाम, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण,दुपारी गाथा भजन,शिवपुराण कथा,रात्री हरिपाठ,हरी किर्तन होणार आहेत तरी पंचक्रोशीतील भावी भक्तांनी या कार्यक्रमाचा व कीर्तन श्रवणाचा अवश्य लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थ चिंचोटी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सविस्तर वृत्त असे की गेली ४० वर्ष अविरतपणे वै भगवान बाबा वै भिमसिंह बाबा यांच्या कृपा आशिर्वादाने व समस्त ग्रामस्थांच्या सहकार्याने मौजे चिंचोटी येथे अखंड हरिनाम सप्ताह चालु आहे.या कार्यक्रमात प्रथम सत्रात सकाळी ७ ते ११ या वेळेत ज्ञानेश्वरी सामुदायीक पारायन सोहळा व्यासपीठ चालक श्री ह भ प नामदेव महाराज भोसले,दुपारी २:३० ते ४:३० या वेळेत श्री ह भ प गोपाळ महाराज थोटे यांच्या अमृतातुल्य वाणीतून शिवपुराण कथेचेही आयोजन करण्यात आले आहे.रात्री ८ ते १० या वेळेत हरी किर्तन होणार आहेत.यामध्ये मंगळवार दि १४ रोजी श्री ह भ प मारुती महाराज तुनेतुने, बुधवार दि १५ रोजी श्री ह भ प शांताराम महाराज शिंदे,गुरुवार दि १६ रोजी श्री ह भ प ज्ञानेश्वर महाराज कदम,शुक्रवार दि १७ श्री ह भ प तुकाराम महाराज मुळीक,शनिवार दि



१८ रोजी श्री ह भ प विठ्ठल महाराज शास्त्री,रविवार दि १९ रोजी श्री ह भ प कल्याण महाराज देवडकर,सोमवार २० रोजी श्री ह भ प बाबुराव महाराज वाघ,यांचे कीर्तन होणार असून मंगळवार २१ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री ह भ प रामायणाचार्य राजाराम महाराज सूर्यवंशी देवगावकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे व नंतर महाप्रसाद होईल.तरी या कीर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थ चिंचोटी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एकल संघटना संघटना झाली खास !! एक एक महिलेचा घेऊन हातात हात!!

चला खेळुया कबड्डी

एकल महिला संघटना ही तमाम महिलांच्या सामाजिक, सांस्कृतिक, संपत्ती अधिकार, आर्थिक, राजकिय बदलासाठी काम करत आहे ही संघटना मागील ८ वर्षांपासून १९००० महिलांसोबत तळात काम करत असताना महिलांच्या मागणी नुसार त्यांना ही समाजामध्ये जीवन जगण्याचा समान अधिकार आहे आणि म्हणून महिलांच्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. समाज परिवर्तन साठी महिला व पुरुष समान असतील तर सर्व व्यवस्थित चालते पण अजूनही महिलांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते. खर तर महिला कोणत्याही क्षेत्रात कमी नाही मागे नाही हे सत्य आहे.

आपल्याला खेळ आणि मैदानी खेळ म्हटले की, शाळेतील मुले किंवा मुलीच दिसतात. खर तर मैदानी खेळ खेळल्याने आरोग्य निरोगी राहते, आणि कबड्डी स्पर्धा व महिला यांचा दूरवर विचार आतापर्यंत दिसून येत नाही वयाच्या १८ वर्षापर्यंत मुली खेळतील, परंतु एकदा का लग्न झाले की, आयुष्यात तिला ही संधी परत मिळाली नाही, व कोणी उपलब्ध करून दिली नाही. एकल महिला संघटना ही महिलांच्या प्रश्नासोबत हक्क,अधिकार व न्यायाच्या मार्गाने लढाई लढत आहे परंतु राज्यघटनेतील मिळालेल्या अधिकार या समाजातील पुरुषव्यवस्थेत तिला मिळाले नाहीत, आज समाजात सर्व स्तरावर महिलांना आरक्षण दिले आहेत, परंतु त्याची अंमलबजावणी होताना दिसून येत नाही एकल महिला संघटना ही महिला सोबत तिच्या हक्कासाठी, संपत्ती सन्मान अधिकार मिळवा, रोजगाराच्या संधी मिळाव्यात, कौटुंबिक हिंसाचार होऊ नये, जाचक रूढी मोढीत काढताना यासाठी वेगवेगळे प्रशिक्षण माहिती देणे तर समाजाच्या जाचक अटि मोडण्याचा प्रयत्न करत आहे.

महिलांनी पेट्रोल पंपावर काम करणे आतापर्यंत आपल्याला पेट्रोल पंपावर पुरुष काम करताना दिसतात, परंतु याला छेद देत एकल महिला मंडळाच्या बैठकीतून महिलांनी रोजगाराचा मुद्दा समोर मांडत आपण पेट्रोल पंपावर काम काम करायला पाहिजे व आणि त्यांनी प्रयत्न केले व काम मिळाले तसेच काम करायच ठरवले आणि जवळपास एकल महिला संघटनेच्या कार्यक्षेत्रात चार तालुक्यातील २५ महिला या पेट्रोल पंपावर उदरनिर्वाहासाठी काम करू लागल्या.

ऑटोरिक्षा चालवणे इथे देखील महिलांना खुप अडचणी आल्या, परंतु समाजात आपण राहत असताना हे पण काम महिला करू शकतात हे दाखवून दिले आहे, महिलांसाठी कोणतीही गोष्ट अशक्य नाही. आणि १६ महिलांनी रिक्षा चालवायला शिकल्या. यामध्ये खूप नाव ठेवले गेले आता तर दोन्ही बाजूंनी पुरुष बसतील का? आता एवढच बाकी होतं असे टोमणे ऐकायला मिळाले, तरी या बोलण्याला न जुमानता महिला रिक्षा चालवायला शिकल्या.

अलंकार काढणे पती निधनानंतर प्रथा की विधवा झाल्यास बांगड्या तोडणे, जोडवी मंगळसूत्र काढणे,व कुंकू पुसणे, हे अघोरी प्रकार होतात, परंतु समाजात अशा मान्य नसलेल्या अनेक जाचक रूढी परंपरा महिला मंडळाच्या महिलांनी छेद देत बंद करण्याचे प्रयत्न केले आहेत. महिलेला वाटत तर काढीन तिने कोणते अलंकार घालावे, हे ती ला ठरवायचा अधिकार आहे,

### महिलांनी मारुती मंदिरात प्रवेश करणे

ग्रामीण भागात अलिखित अशा प्रकारच्या प्रथा तयार झाल्यात की, एकदा केले की ती परत परत होते आणि ती समाजाची रुढ़ होऊन जाते. त्यावर विचार होत नाही अशाच पद्धतीत महिलांनी मारुतीच्या मंदिरात जाऊ नये कारण तिला मासिक पाळी येते मग पाळी न येणाऱ्या महिलेला देखील आपण अशुभ मानतो. कारण ती मूल जन्माला घालू शकत नाही, म्हणजे पहा आपणच कसे सोयीने सर्व परंपरा पुढे नेतोय, व बळकट करतो, पुरुषाला जन्माला घालणारी महिलाच आहे, आणि ही इतकी मोठी शक्ती महिलांना प्रधान असताना नेहमीच तिला खालचा दर्जा मिळतो. आणि मग जेव्हा महिला मारुती मंदिरात प्रवेश करतात तेव्हा आपोआप लोक बोलायचे थांबतात.

## सामाजिक न्याय!! बंधुता!! स्वातंत्र्य!! समानता!!!! धर्मनिरपेक्षता!! समाजवाद!!

आपण कोण आहोत आणि मुळात हे काढणे, घालणे हे कुठं ही लिहिले नाही, तिला स्वतःचा हक्क, अधिकार आहे व स्वतंत्र आहे. हे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत दिलेले आहेत कुणी काय घालयचे काय नाही घालायचे हे स्वतंत्र प्रत्येकाला आहे.

सहल-महिलांनीच फिरायला जाणे फक्त महिला व ते पण दोन दिवस मुक्कामी सहल काढणे व तेही पुरुषांच्या मदती शिवाय कारण दिवस-रात्र महिला आपल्या कुटुंबाचा विचार करतात, सर्व जबाबदारी पार पाडतात, पण त्यांना स्वतःसाठी मोकळा वेळ मिळत नाही मग फिरायला जाण, ड्रेस घालने असेल, मस्त गाणे म्हणत असेल इतकेच काय आपल्या समाजात अशा काही प्रथा चुकीच्या पुढे ओढत नेतात, त्यावर कोणी विचार करतच नाही किमान आपण तरी विचार करतो का? हे करत असताना जे मनाला पटते तेच करायला हवे आणि जो आनंद घेण्याचा अधिकार स्वातंत्र्य सर्वांना आहे तसेच महिलांना पण आहेत बाहेर पडून महिलांना फिरताना शाळेचे दिवस आठवले तसेच पर्यटन स्थळ पाहण्यात आले इतिहास माहिती झाला.

निवडणूक आपण आज देखील पाहतो की, महिला मोठ्या प्रमाणावर ग्रामपंचायत निवडून येतात व सरपंच पण आहेत सदस्य आहेत, पण त्याचा कारभार कोण पाहतो ? तिला ते अधिकारच मिळाले नाही गावात काम करताना सरपंच महिला असताना त्यांचा कारभार नवरा मुलगा किंवा सासरा म्हणजे घरातील पुरुष पाहतात, सरपंच असुन ही काही जनीं सरपंच पदाच्या खुर्चीवर बसण्याचा मान मिळाला नाही. राजकीय शिक्षण तिला शिकू दिले जात नाही, तिला निर्णय घेऊ दिले जात नाही, सह्या कर सांगितले की, फक्त सहा करायचा अधिकार आहे काही ठिकाणी तर सह्या देखील दुसरेच करतात मग संविधानाने महिलांना दिलेल्या आरक्षणाचा खरा उपयोग कोणाला झाला???



**एकल महिला संघटना**
रुक्मिणी नागापुरे
९०४९०२५४१५.
(संकलन वसुदेव शिंदे अंबाजोगाई )

संपत्तीत समान अधिकार मिळणे एकल महिला संघटनाच्या कामात समोर आलेल्या मुद्द्यावर प्रश्न सोडवण्यासाठी त्या विषयावर काम करताना त्यांचे मुळासकट ती समस्या दूर होण्यासाठी काम केले जाते यात जर पाहिले तर महिलांना विवाह नोंदणी म्हणजे लग्नाचा पुरावाच नसतो, आणि मग या पाठीमागे अनेक तोटे व फायदे लक्षात आले. जसे विवाह नोंदणी जर करायचे असेल तर मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ असणे आवश्यक आहे



तसेच विवाह नोंदणी प्रमाणपत्र असेल तर पतीचे नाव आपल्या नावासोबत लागते, त्यामुळे बँक खाते, शासकीय योजना, मुलाला शाळेत ऍडमिशन साठी, मतदान कार्ड बनवणे, निवडणूक लढवणे, तसेच घरात हिंसाचार देखील होणार नाही त्याचे तोटे देखील आहेत कारण भविष्यात कागदपत्रे खूप महत्त्वाची आहेत पतीच्या संपत्तीत पत्नीला समान अधिकार मिळतो. बालविवाहचे प्रमाण कमी होईल आणि महत्त्वाचे म्हणजे विवाह नोंदणी संदर्भात जनजागृती झाली याबाबत अजून ग्रामीण भागातील विवाह नोंदणी बाबत माहिती झालेली नाही किंवा विवाह नोंदणीचे फायदे किती महत्त्वाचे आहेत महिलांसाठी यासाठी संघटना चे कार्य सुरू आहे.

कबड्डी स्पर्धा महिला आणि कबड्डी हे समीकरण जरा समाजाला रुचायला जड जाते कारण आपली पुरुष प्रधान संस्कृती आहे. आणि फक्त पुरुष कबड्डी खेळतात एकल महिला संघटना ही समानतेच्या पातळीवर महिलांनी देखील कबड्डी खेळली पाहिजे आणि ही आता महिलांनाही मोठी संधी व उपलब्ध झाली आहे एकल महिला संघटनेच्या माध्यमातून खरच दैनंदिन जीवनात कुठेतरी मनात बालपण आठवते आणि मग हसू येते खरच का कबड्डी खेळायला मिळेल यातून ठरवलं तर लोकसहभागातून महिलांसाठी कबड्डी स्पर्धा घेणे आणि मग वर्गणी जमा करून सौजन्याची मदत घेऊन प्रथमच मराठवाड्यात ग्रामीण भागातील अगदी ७० वर्षाच्या आजी मैदानात उतरल्या व डोक्यावरचा पदर पडून न देता बाजी मारली आणि सासू सुनानी एकजुट करून घट्ट पकड धरून कबड्डी मध्ये विजय मिळवला आहे,अशा प्रकारच्या प्रसंग आलेत किती आनंद झाला त्या महिला शब्दात सांगू शकत नव्हते आता तर मोठ्या संख्येने महिलांनी राज्यस्तरीय कबड्डीसाठी सहभाग नोंदवावा तसेच भविष्यात ज्या भावना दाबून ठेवल्यात घराबाहेर पडायला विरोध असताना खेळायला मिळणे, अशा सर्व अडचणी दूर होऊन मनात आले तर खेळायला मिळाले पाहिजे यासाठी महिलांना स्वतंत्र ग्राउंड मिळायला हवेत भविष्यात २५ वर्षाच्या वरील महिलांना ही छान संधी उपलब्ध आहे आणि याचा नक्कीच आनंद घ्यावाआपल्या सोबत एकल महिला संघटना ही तमाम महिलांच्या सतत आपल्या आनंदात सुखात,दुःखात सोबत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT